शिक्षण ( प्राथमिक ) विभाग,
जिल्हा परिषद , नागाळा पार्क , कोल्हापूर
RTE
फोन नं- (०२३१) २६५०७८१
फॅक्स नं-(०२३१) २६५५५९८
Email-ssakolhapur१@gmail.com

जा.क्र.कोजिप/शिक्षण/प्राथ/वशि-२९/१६४/२०२४
शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद,कोल्हापूर.
दिनांक:-२५/०१/२०२४

## प्रमाणपत्र - २०२२-२०२५

### नमुना - २

प्रति ,
अध्यक्ष /सचिव
छत्रपती शाहू इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस एज्युकेशनल ॲन्ड
रिसर्च सेंटर (सायबर),कोल्हापूर जि.कोल्हापूर

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता नमुना - २ प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ :- १) प्रशासनाधिकारी प्राथमिक शिक्षण समिती,म.न.पा.कोल्हापूर यांच्या कडून प्राप्त प्रस्ताव दि.१६/०१/२०२४
२ ) या कार्यालयाकडील मंजूर टिपण्णी दि. १८/०१/२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र. १ अन्वये आपल्या प्राप्त प्रस्तावास मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.कोल्हापूर दिनांक **सन-२०२२-२०२३** पासून दिनांक **सन २०२४-२०२५** पर्यत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते ८ वी** या वर्गाकरीता **आर.एस.ई.एम.एस.ग्लोबल स्कूल,कोल्हापूर जिल्हा- कोल्हापूर माध्यम - इंग्रजी (स्वयंअर्थसहाय्यित) इयत्ता- १ ली ते ८ वी** या शाळेस बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये तात्पुरती मान्यता देणेत येत आहे.

**वरील मान्यता ही खालील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून आहे:-**

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल .

२) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ (जोडपत्रक एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम ,२०११ (जोडपत्र दोन ) मधील तरतुदीचे शाळा पालन करेल

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील प्रमाणकाचे अनूपालन करण्यात येईल .

४) परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमांच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी परिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल .

५) संस्था /शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या माता पित्यास पालकास भाग पाडणार नाही .

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळामध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) A) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

B) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

C) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही

D) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकांस ,नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

E) दिव्यांग/विशष गरजा असलेल्या विद्यार्थ्याच्या अधिनियमाच्या तरतूदीनुसार समावेश करण्यात येईल.

F) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

G) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

H) शिक्षकाने /शिक्षकेने खाजगी शिकवणी कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, यांची सूनिश्चिती शाळा करील.

८) शाळा समूचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार कलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. गट शिक्षणाधिकारी यांचे कडून प्राप्त प्रस्तावानुसार शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या.

A) शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - ११.३ एकर

B) एकूण बांधकाम क्षेत्रफळ - ११३०० s.qm

C) खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - ६३२९ s.qm

D) वर्गखोल्यांची संख्या - ३०

E) कार्यालय-नि- भांडार- नि- मुख्याध्यापकांची खोली- आहे.

F) मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृह स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी आहे.

G) पिण्याच्या पाण्याची सुविधा- आहे .

H) दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर- लागू नाही.

I) अध्यापन, अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री, ग्रंथालय यांची उपलब्धता - ग्रंथालय खोली आहे.

J) वाचन साहित्य विनासायास उपलब्ध- आहे

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक **२७३४१३०३९०४** आहे या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर - पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल. अशा सूचनांचे पालन करावे.

१८) सदरची RTE मान्यता आपलेकडील प्राप्त प्रस्तावाच्या अधीन राहुन देण्यात आलेली आहे. सदर शाळेच्या कागदपत्रामध्ये, भौतिक सुविधा मध्ये तफावत अढळल्यास व कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा न्यायालयीन प्रकरण उदभवलेस त्यास सर्वस्वी आपण जबाबदार राहाल आणि आपल्या शाळेस दिलेली सन २०१९-२०२२ ची RTE मान्यता रद्द समजण्यात येईल.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद कोल्हापूर.

**प्रत माहितीसाठी -**

मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर.

**प्रत पुढील कार्यवाहीसाठी-**

**१. प्रशासनाधिकारी,प्राथमिक शिक्षण समिती,म.न.पा.कोल्हापूर.**

२/-सदरची RTE मान्यता आपली शिफारस व अभिप्राय विचारात घेता देण्यात येते आहे. तसेच सदर शाळेच्या कागदपत्रामध्ये, भौतिक सुविधा मध्ये तफावत आढळल्यास व कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा न्यायालयीन प्रकरण उदभवलेस त्यास सर्वस्वी आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**२. मुख्याध्यापक- आर.एस.ई.एम.एस.ग्लोबल स्कूल,कोल्हापूर जि.कोल्हापूर**